# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032.Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.०३ दिनांक ०९/०१/२०२१

### बोईसर पोलीस ठाणे हद्दीत मंगलम् ज्वेलर्स येथे झालेल्या चोरीच्या गुन्हयांतील २ आरोपीत यांना अटक करुन १४ लाख रुपये किंमतीचे ३२४.८०० ग्रॅम सोने व ५,५०,०००/- रुपये रोख रक्कम जप्त

दिनांक २९/१२/२०२० रोजी रात्री ०९.०० वाजता ते दि.३०/१२/२०२० रोजी ०८.३० वाजताचे दरम्यान चित्रालय, बोईसर येथील साई शॉपिंग सेंटर मधील मंगलम ज्वेलर्स दुकानामध्ये घरफोडी झाली होती. सदर घरफोडीत आरोपीत यांनी दुकानातील तिजोरी व ड्राव्हर गॅस कटरच्या साहाय्याने तोडुन ७,००,१७,२३४/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने व ६०,००,०००/- रोख रक्कम असा एकुण ७,६०,१७,२३४/- रुपये किंमतीचा माल घरफोडी चोरी करुन नेला आहे. सदर दुकानाचे मालक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक २९/१२/२०२० रोजी बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ३२०/२०२० भा.द.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे ४ वेगवेगळे पथक तयार करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे १) पोउपनि/आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर, २) पोउपनि/योगेश खोंडे, बोईसर पोलीस ठाणे ३)पोउपनि/संदिप पाटील, बोईसर पोलीस ठाणे ४) सहा.पोलीस निरीक्षक श्री.गीताराम शेवाळे, मुख्यालय असे ४ पथक तयार करुन झारखंड राज्यात पाठविण्यात आले होते. सदर पथकांनी गुप्त बातमीदारा मार्फत माहीती काढली. मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी बदरुद्दीन कादिर शेख व हासीम फैजुद्दीन शेख रा.नया खट्टीटोला पो.पिअरपुर ता.राजमहल जि.साहिबगंज राज्य-झारखंड यांना ताब्यात घेतले. त्याचेकडे सखोल चौकशी केली असता आरोपीत यांचा सदरच्या गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे सांगितले. आरोपीत यांच्या ताब्यातुन ३२४.८०० ग्रॅम सोने (१४ लाख रुपये) व ५,५०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण १९,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयातील उर्वरीत पाहिजे आरोपीत यांचा शोध घेण्याकरिता १) सहा.पोलीस निरीक्षक श्री.प्रदिप पाटील, वाडा पोलीस ठाणे, २) सहा.पोलीस निरीक्षक श्री. गजानन पडाळकर,पालघर पोलीस ठाणे ३) सहा.पोलीस निरीक्षक श्री. विलास जाधव, तलासरी पोलीस ठाणे, ४) पोउपनि अल्पेश विशे, वाणगांव पोलीस ठाणे ५) पोउपनि अजित कणसे, मनोर पोलीस ठाणे ६) पोउपनि अरुण भिसे, बोईसर पोलीस ठाणे असे ६ पथके तयार करुन झारखंड व पश्चिम बंगाल येथे रवाना केले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री.प्रदिप कसबे, बोईसर पोलीस ठाणे हे करित आहे.

सदरची कामगिरी श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, सुचनेप्रमाणे श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.विश्वास वळवी, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.प्रदिप कसबे, सहा.पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र पारखे, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर सहा.पोलीस निरीक्षक श्री. गीताराम शेवाळे, दहशतवाद विरोधी पथक, पोउपनि/आशिष पाटील, पोउपनि/योगेश खोंडे नेमणुक- बोईसर पोलीस ठाणे, पोहवा/सचिन पाटील, पोहवा/प्रशांत तुरकर, पोना/जगदीश गोवारी, पोना/दिनेश गायकवाड, पोना/अनिल चव्हाण, पोना/सुभाष आव्हाड, पोना/अरविंद धुमाळ, पोशि/तुषार माळी, पोशि/प्रशांत निकम, पोशि/जितेंद्र वसावे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner